**L. A. BILL No. I OF 2023.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१८८८ चा ३. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका
१९४९ चा ५९. अधिनियम यांमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

**१.** या अधिनियमास, मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी २८६०—१ (१०६—३-२०२३)

प्रकरण दोन

**मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.**

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ब) मध्ये, “पाच पालिका सदस्य” या मजकुराऐवजी, “दहा नामनिर्देशित पालिका सदस्य” हा मजकूर दाखल करण्यात येईल. १८८८ चा ३.

प्रकरण तीन

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.**

सन १९४९ चा अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५ मध्ये, पोट-कलम (२) मधील, खंड (ब) मध्ये, “ पाच पेक्षा अधिक नसतील इतक्या ” या मजकुराऐवजी, “ निवडून आलेल्या पालिका सदस्यांच्या एकूण संख्येच्या दहा टक्क्यांपेक्षा अधिक नसतील इतक्या किंवा दहा, यापैकी जी कमी असेल इतक्या” हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९४९ चा ५९.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १.]**

**[ मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. एकनाथ शिंदे,**
मुख्यमंत्री.]

**[ विधानसभेने दिनांक २ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई